# वास्तुदर्शन

**(पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण महासंघाचे मुखपत्र)**


संपादक :
**सुहास पटवर्धन,** अध्यक्ष

संपादन सहाय्य :
**संचालक मंडळ**

पत्ता : ३१३ नारायण पेठ, प्रभात प्रेससमोर,
विजय टॉकीज जवळ, पुणे ४११ ०३०.
**दूरभाष : ०२०-२४४५४०१०**
**ई-मेल : punefed@gmail.com**
**वेबसाईट : www.punefed.com**
पृष्ठ संख्या - १२
कोणत्याही अंकापासून वर्गणीदार होता येते.

**वर्ष-१२** * **जुलै २०२५** * **अंक - १**




पॅराडाई ग्रुप आणि पुणे जिल्हा सह. गृह संस्था आणि अपार्टमेंटस् महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने पुनर्विकास व स्वयंपुनर्विकास मार्गदर्शन सत्र - अश्वमेध हॉल, कर्वे रस्ता माजी संचालक व अतिरिक्त आयुक्त दिनेश ओऊळकर, महासंघाचे अध्यक्ष श्री. सुहास पटवर्धन, श्री. अजय कांग्राळकर (व्यवस्थापकीय संचालक पॅराडाईम ग्रुप), आर्कि. आशिष माहाडकर आणि संजीव ओक, ॲड. श्रीप्रसाद परब - दि. १३ जून २०२५



MCDC आणि महाराष्ट्र राज्य सहकारी गृह. संस्था आणि अपार्टमेंटस् महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय प्रशिक्षण, १५ जून २०२५ - प्रशिक्षक श्री. सुहास पटवर्धन (अध्यक्ष), मनीषा कोष्टी (सचिव), ॲड. मृद्‌गंधा जोशी (संचालक), श्री. चारुहास कुलकर्णी (कोषाध्यक्ष), श्री. ॲव्हेलिनो नरोना (संचालक)



Saraswat Bank
Saraswat Co-operative Bank Ltd.
(Scheduled Bank)
Manage your Housing Society & Commercial Complex needs with...
Saraswat Bank Society Connekt Package
Quick Payments
Online Management of Society Data
Automated Maintenance Billing
SMS & E-Mail Notification
Bank Statement View
Virtual Account
Track Accounting of the Society
Society Connekt
Free of Cost
App available with Saraswat Bank
Society Account
Society VALUE
Society PRIME
Start with our Welcome Gifts
Go Cashless
Hassle free maintenance payments with Society Connekt App
Society Accounting made Easy
Mobile Admin dashboard for Effortless Accounting
Scan this code to download the App
iOS & Android
For more details, contact your nearest branch or visit
www.saraswatbank.com
www.scbsocietyconnekt.com
www.saraswatbank.com
T&C Apply, July 2025

# पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण महासंघ मर्यादित

**punefed@gmail.com**

♦ *संचालक मंडळ* ♦

| | |
|---|---|
| मा. सुहास पटवर्धन, अध्यक्ष | ९४२२००४७०१ |
| मा. सुभाष कर्णिक, उपाध्यक्ष | ९७६६६०६१४६ |
| सौ. मनीषा कोष्टी, सचिव | ९९२२४१९२१६ |
| मा. चारूहास कुलकर्णी, कोषाध्यक्ष | ९५५२५४६६०७ |
| मा. अनिल असगेकर | ९९६०६०८०७३ |
| मा. सुभाष ढवळे | ९४२१०५८२५५ |
| ॲड. मृद्‌गंधा जोशी | ८७६६४३२७६९ |
| मा. जुजर हैदरी | ९३७१०१७४४० |
| मा. शिवाजी उराडे | ९४२३०१५९९६ |
| मा. अजित चौगुले | ७७५७०२१९५३ |
| मा. विलास थोरात | ९८९००५४३५१ |
| ॲड. प्रकाश तोंडारे | ९७६३६०३३८४ |
| मा. समीर रुपदे | ९८५०५६७४७५ |
| मा. मनोहर देशपांडे | ९३७१०७३७२७ |
| मा. राजन प्रसादे | ८८३०६१७८५९ |
| मा. संभाजी घुंडरे | ९८८१०७७२९६ |
| मा. संजय सूर्यवंशी | ९६२३९२९८८९ |
| मा. अव्हेलिनो नरोना | ९९७०४७३१८९ |

♦ *तज्ञ संचालक* ♦

ॲड. वसंतराव कर्जतकर

आर्किटेक्ट विश्वास कुलकर्णी

♦ *कार्यकारी संचालक* ♦

| | |
|---|---|
| कर्नल प्रमोद दहीतुले | ९९९९५३७४३२ |

## संपादकीय

**आं**तरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या मध्यावर सहकार दिवस साजरा करूया. सहकार वृद्धींगत होण्यासाठी या निमित्ताने सभासदांसाठी विविध उपक्रम घेऊ शकतो. त्यातून परस्पर परिचय आणि संस्थेच्या कामकाजाची माहिती घेणे हे उद्देश सफल होतील. त्याचबरोबर सध्या पावसाळा सुरू असल्याने त्यादृष्टीने संस्थेच्या परिसरातील संभाव्य धोके व अडचणी लक्षात घेऊन करावयाच्या उपाययोजनांची माहितीही सर्व सभासदांना द्यावी.

सध्या अति पावसामुळे टेकडीच्या उतारावरील संस्थांमध्ये पाणी साठणे, सीमा भींतींना धोका, साप निघणे, इत्यादी समस्या येतात. तसेच नदी, ओढे, नाले यांच्या जवळील गृह संकुलांमध्ये पाणी शिरते. त्यामुळे वाहनतळातील गाड्यांचे नुकसान होते. तळमजल्यावरील घरांचे नुकसान होते. अशा सर्व गोष्टींची समितीने नोंद घेऊन पूर्वनियोजन करून आपत्कालीन परिस्थितीत काय करायचे याची माहिती सभासदांना द्यावी. आवश्यक संपर्क क्रमांक सूचना फलकावर लावावेत. तसेच अशा प्रकारच्या अडचणी येऊ नयेत म्हणून नियम पाळून सर्व कामे करावीत. अतिक्रमण, अनधिकृत बांधकाम याबाबत मनपा विभागाला तात्काळ कळवावे म्हणजे त्यामुळे अपघात घडल्यास समितीवर दोषारोप होणार नाहीत.

निसर्गाचे संरक्षण करणे आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. त्यामुळे वृक्ष लागवड, संवर्धन, नदी, नाले, ओढे यांची स्वच्छता, प्लास्टिक वापर बंदी या गोष्टींकडे कटाक्षाने समितीने सभासदांचे लक्ष वेधावे व त्यासाठी विधायक कार्यक्रम घ्यावेत.

तुकाराम महाराजांनी म्हटले आहेच -

***वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे***

**- मनीषा विजय कोष्टी**

***

## महासंघाची अधिकृत विक्री केंद्रे

- १. **स्कुलशॉपी -** दुकान क्र. ९, कॉर्पोरेशन बिल्डिंग, चैतन्य हॉस्पिटलसमोर, चापेकर चौक, चिंचवड, पुणे - ४११०३३. भ्रमणभाष : ९३२६०५४९०६
- २. **श्री स्टेशनर्स -** रेव्हेन्यू कॉलनी, तळेगाव दाभाडे, पुणे भ्रमणभाष : ९२७३५०५६०४
- ३. **निशा कन्सल्टन्सी -** कृतिका अपार्टमेंट, ग्रीन फुड रेस्टॉरंट जवळ, कोथरुड, पुणे ४११०३८. भ्रमणभाष : ९८५०८८८९७९
- ४. **सोसायटी प्लस -** बाजीराव रस्ता, शुक्रवार पेठ, पुणे-४११०३०. भ्रमणभाष : ९३७००८८९९५
- ५. **प्राईड साईन -** वडगाव धायरी, पुणे - ४११०४१. भ्रमणभाष : ९११२१९१६११
- ६. **सौ. गीतांजली चेतनकुमार वेल्हाळ -** सी-६, सीता रेसिडेंसी, विठ्ठल मंदिर जवळ, आकुर्डी, (पिंपरी चिंचवड), पुणे - ४११०३५. भ्रमणभाष : ७३५०३०७६९३
- ७. **सुकन्या निरगुडे -** एच-४२, एकता सोसायटी, शिवतीर्थनगर, कोथरुड, पुणे - ४११०३८. (शाखा : सासवड, कोडीत) भ्रमणभाष : ९१५६४१४१९१
- ८. **मे. एस. जे. खामकर ॲण्ड असोसिएटस् -** मुंढवा घोरपडी रोड, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मागे, मुंढवा, पुणे - ४११०३६. भ्रमणभाष : ९६२५३४३४३४
- ९. **स्वाती पवार - समर्थ सर्व्हिसेस -** स.नं. ४३/२, शिवांजली लेन नं. ३, दत्तनगर, आंबेगाव, पुणे - ४११०४६. भ्रमणभाष : ९४०३९७८९४३.
- १०. **गिरीश मनोहर पाठक -** गौरव निवास, साई चौक, नवी सांगवी, पुणे - ४११०२७. भ्रमणभाष : ९५१८७७७९५०, ९८२३०५९९९४
- ११. **पी.एल. इंदोरे ॲण्ड असोसिएटस् -** कमलराज दत्तविहार सोसायटी, मोशी, चिखली रोड, मोशी, पुणे - ४१२१०५. भ्रमणभाष : ९७३०७६७५७९
- १२. **द स्टेशनरी आयकॉन -** शॉप नं. ६, तुषार कॉम्प्लेक्स, पेट्रोलपंप समोर, पौड रोड, भुगाव, पुणे - ४१२११५.
- १३. **रामबाग विकास मंडळ -** विश्वशांती मार्ग, रामबाग कॉलनी, पौड रस्ता, पुणे - ४११०३८. भ्रमणभाष : ९८२२४३८९४४
- १४. **कुमार सबलाईम सोसायटी -** पारगे नगर, कोंढवा खुर्द, कोंढवा पोलिस स्टेशनमागे, पुणे - ४११०४८. दूरभाष : ०२०-४८६०७७१७
- १५. **सिंहगड रोड शाखा -** विश्वगंगा, कॉम्प्लेक्स, संतोष हॉल जवळ, आनंदनगर, सिंहगड रोड, पुणे - ४११०५१. भ्रमणभाष : ९८६०८२०३९०
- १६. **सोसायटी स्मार्ट -** इस्टर्न विंग, जय गणेश विश्व, विश्रांतवाडी चौक, पुणे - ४११०१५. भ्रमणभाष : ९९६०८२९९९८

# पावसाळा - अशी घ्या घराची काळजी

**इमारतीचे आयुर्मान, वातावरणातील बदल, स्ट्रक्चरल व थर्मल स्ट्रेसेस, बांधकामांचा वेग, दिवस व रात्रीतील तापमानातील तफावत, अयोग्य बांधकाम साहित्याचा वापर, बांधकाम कामगारांचे अकौशल्य, बांधकामावरची देखभाल इत्यादी कारणांमुळे साधारणपणे ४-५ वर्षानंतर इमारतींना पाणीप्रतिबंधक देखभालीची आवश्यकता भासू लागली आहे.**

**ज**सजसा पावसाळा सुरू होत आला की आपण राहात असलेल्या इमारती, सदनिका, बंगलो, रो-हाऊसेस इत्यादीच्या देखभालीची कामे प्रामुख्याने केली जातात. पुणे व आजुबाजुच्या परिसरात जुन्या इमारतीमधील छतामधील पाणी गळती व बाह्य भिंतीमधील ओलावा या समस्या प्रामुख्याने भेडसावत असतात. त्यामुळे दिवसेंदिवस अशा समस्यांवर देखभालीची आवश्यकता वाढत आहे. याची प्रमुख कारणे म्हणजे इमारतीचे आयुर्मान, वातावरणातील बदल, स्ट्रक्चरल व थर्मल स्ट्रेसेस, बांधकामांचा वेग, दिवस व रात्रीतील तापमानातील तफावत, अयोग्य बांधकाम साहित्याचा वापर, बांधकाम कामगारांचे अकौशल्य, बांधकामावरची देखभाल इत्यादी आहेत. या कारणामुळे साधारणपणे ४-५ वर्षांनंतर इमारतींना पाणी प्रतिबंधक देखभालीची आवश्यकता भासू लागली आहे.

**काळजी घेतली की काळजी करावी लागत नाही.** या उक्तीप्रमाणे दरवर्षी पावसाळ्यापूर्वी आपण राहात असलेल्या इमारतीचे प्राथमिक सर्वेक्षण करणे जरुरीचे आहे. सोसायटीमधील सभासदांनी खालीलप्रमाणे सुपरव्हिजन करुन आवश्यकतेनुसार कामे करुन घेतल्यास पावसाळ्यात होणारा पाणी गळतीचा त्रास कमी होण्यास मदत होईल.

**टेरेस किंवा गच्ची :**

मोठा पाऊस सुरू होण्यापूर्वी प्रथमतः टेरेसवर असणारे अडगळीचे सामान, जुने फर्निचर, निरुपयोगी कुंड्या इत्यादी सामानाची विल्हेवाट लावावी. टेरेसवर उगवलेली अनावश्यक झाडे उदा. वड, पिंपळ इत्यादी मुळापासून काढून टाकावी. लिफ्टरुम टॉप, वॉटर टँक टॉप इत्यादी ठिकाणचा सर्व भाग साफ करुन सर्व आऊटलेट मोकळी करुन घ्यावीत. काही वेळा पाण्याची आऊटलेट्स मोठी करुन घेणे क्रमप्राप्त ठरते. ती पुन्हा चोकअप होणार नाहीत याची काळजी घ्यावी. त्यासाठी बाजारात निरनिराळ्या प्रकारच्या जाळ्या उपलब्ध आहेत. त्यात असणारा कचरा वेळोवेळी साफ केला गेला पाहिजे. म्हणजे पावसाळ्यात पडणाऱ्या पाण्याला कुठलाही अडथळा होणार नाही. टेरेसवर साधारणपणे पॅरापेट वॉलवर असणारी फिटींग्ज, केबल्स, पाईपलाईन, सोलर लाईन यांची अयोग्य मांडणी पुष्कळदा गळतीचे कारण बनू शकते. अशा ठिकाणी संबंधित सर्व्हिसचे योग्य प्रकारे मांडणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यासाठी बाजारात योग्य प्रकारचे साहित्य उपलब्ध आहे.

टेरेसवर असणाऱ्या भेगा या बाजारात मिळणाऱ्या योग्य साहित्याच्या सहाय्याने भरुन घ्याव्यात. जेणेकरुन त्यातून पाझरणारे पाणी खाली जाऊन होणारे नुकसान थांबते. प्रथमतः टेरेसवर पडलेल्या भेगा तार ब्रशने साफ करुन पाण्याने स्वच्छ धुवून, पुसुन त्यामध्ये ते व्यवस्थितरित्या भरून घ्यावे. त्याने उत्तम रिझल्ट येण्यास मदत होते. भेगांचे प्रमाण जास्त असेल, तर संपूर्ण टेरेसवर भेगा भरुन केमिकल कोटींग गरजेनुसार करणे आवश्यक आहे. सध्या बाजारात त्यासाठी भरपूर पर्याय उपलब्ध आहेत. वरील कोटिंग करताना त्याचा टिकाऊपणा वाढेल असे साहित्य वापरावे. सध्या बाजारात उष्णतारोधक व पाणी प्रतिबंधक असे दोन्ही गुणधर्म असलेली कोटींग उपलब्ध आहेत. ज्यामुळे टेरेसचे waterproofing खालील रुमचे तापमान कमी होण्यास मदत होते. सर्वसाधारणपणे याची ५ ते ७ वर्षापर्यंत हमी दिली जाते. वरील कामे तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली करुन घेऊ शकतात, टेरेसवर काही ठिकाणी पोपडे पडले असल्यास संबंधित भाग काढून टाकून पुन्हा घोटाई करुन, पाण्याचा बटाव व्यवस्थित करून त्यावर केमिकल कोटिंग करणे आवश्यक असते. वरील उपाय केल्यास छतावरील गळतीपासून सुटका होऊ शकते.

**इमारतीच्या बाह्य भेगा : (external crack filling)**

इमारतीचा बाह्य भेगांमधून होणारी पाणी गळती व त्यामुळे आतील भागात येणारा ओलावा यामुळे रहिवाश्यांचे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य बिघडते. साधारणपणे ५ वर्षातून एकदा इमारतीमधील बाह्य भेगा भरुन घेणे आवश्यक आहे. **हे काम करताना झुला बांधणे आवश्यक आहे. त्यावर काम करताना सुरक्षेची सर्व उपकरणे वापरली जात आहेत याची खबरदारी घ्यावी.** काम करणाऱ्यांचा विमा आहे की नाही हे देखील तपासून घ्यावे. ही कामे करताना पुरेशी देखभाल आवश्यक असते.

बाह्यभिंतीवरील भेगा भरताना कुशल कारागिरांकडून (skilled labaur) आजुबाजुचा भाग प्रथम तार ब्रशने घासून, धुवून त्यामध्ये पत्रा किंवा ब्रशच्या सहाय्याने भेगा करुन साधारणपणे ६ तासाच्या

अंतराने पुन्हा दुसरा कोट देणे आवश्यक आहे. हे करताना बाह्यभेगा उघड्या करण्याची गरज नाही. उत्तम प्रकारचे क्रॅकफिलर (paste form) वापरल्यास निश्चितच पाणी प्रतिबंध क्षमता वाढेल. आवश्यकतेनुसार त्यावर प्रोटिक्टिव्ह कोट सुद्धा देता येतो.

सतत पावसाचा मारा होणाऱ्या व भरपूर भेगा असणाऱ्या ठराविक भिंतीवर मात्र संपूर्णपणे कोटींग करणे आवश्यक असते. त्यामुळे उत्तम रिझल्ट येण्यास मदत होते. इमारतीमधील काही मोठ्या भेगांसाठी (५ मिमी) PU sealeut चे पर्याय बाजारात उपलब्ध आहेत. यांनी क्रॅक भरुन घेतल्यास टिकाऊ क्षमता वाढते. वरील कामे योग्य मार्गदर्शनाखाली करुन घेतल्यास इमारतीचा पावसापासून बचाव होण्यास मदत होईल. अशा प्रकारची देखभालीची कामे वेळेत करुन घेतल्यास पावसाळा सुखकर व आनंददायी होण्यास मदत होईल.

***

*सकाळमधून साभार*

**– आशिष संकपाळ**

(B.E. Civil)

वॉटर प्रुफींग सोल्युशन

भ्रमणभाष : ९८५०९०४७६०

# : महासंघाचे सहकार दरबार :

| अ.क्र. | सहकार दरबारचे नाव | वार | वेळ |
|---|---|---|---|
| १. | **धनकवडी –** रक्षालेखा सोसा., सर्व्हे क्र. ३०, विक्रमनगर, धनकवडी–४३. | पहिला रविवार<br>**श्री. शिवाजी उराडे** | (स. ११ ते १)<br>९४२३०१५९९६ |
| २. | **पिंपळे सौदागर –** गणेश रेसिडेन्सी, लोटस हॉस्पिटल जवळ, पिंपळे सौदागर, पुणे–२७. | पहिला रविवार<br>**श्री. चारुहास कुलकर्णी** | (स. ११ ते १)<br>९५५२५४६६०७ |
| ३. | **चिंचवड –** गोखले वृंदावन सोसा., चाफेकर चौक, चिंचवड, पुणे–३३. | दुसरा गुरुवार<br>**श्री. सुभाष कर्णिक** | (स. ११ ते १)<br>९७६६६०६१४६ |
| ४. | **मुख्य कार्यालय –** ३१३, नारायण पेठ, प्रभात प्रेस समोर, पुणे–३०. | तिसरा शनिवार<br>**ॲड. प्रकाश तोंडारे** | (स. ११ ते १)<br>०२०–२४४५४०१० |
| ५. | **स्वप्नशिल्प –** स्वप्नशिल्प सोसा., वारजे क्षेत्रीय कार्यालयाजवळ, कोथरुड, पुणे–३०. | चौथा शनिवार<br>**श्री. सुभाष ढवळे** | (स. ११ ते १)<br>९४२१०५८२५५ |
| ६. | **तळेगाव दाभाडे –** समाज मंदिर (संस्था कार्यालय), समाज सेवक सह. गृह. संस्था म. (रेव्हेन्यू कॉलनी), चाकण रोड, फिश मार्केटच्या मागे, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे–४१०५०७. | चौथा रविवार<br>**ॲड. ज्योत्स्ना जोशी** | (स. ११ ते १)<br>९२६०२०१६५० |
| ७. | **सहकारनगर –** श्रीगजलक्ष्मी सह. गृह संस्था, सर्व्हे क्र. ८२/२अ, सहकारनगर–१, गांधी ट्रेनिंग कॉलेजसमोर, पुणे–०९. | दुसरा शनिवार<br>**श्री. श्रीराम कुंचुर** | (स. ११ ते १)<br>९४२२०१२१५६ |
| ८. | **औंध –** सुरोभी पार्क, ई–६०३, डीएसके आकाशगंगा शेजारी, नागरस रोड | दुसरा रविवार<br>**सौ. प्रीती शिरोडे** | (सायं. ४ ते ६)<br>९२८४५८८६३४ |
| ९. | **कोंढवा – कुमार सबलाईम सोसायटी –** पारगे नगर, कोंढवा खुर्द, पुणे ४११०४८. | चौथा रविवार<br>**श्री. अव्हेलिनो नरोना** | (स. ११ ते १)<br>९९७०४७३१८९ |
| १०. | **सिंहगड रोड –** ट्युलिप सोसायटी, नवशा मारुती जवळ, पुणे – ४११०५१. | पहिला रविवार<br>**श्री. विलास थोरात** | (स. ११ ते १)<br>९८९००५४३५१ |

# Everything you need to know about community composting and its benefits for housing societies

Around 60% to 70% of waste produced daily in cities like Pune PCMC and Mumbai is wet waste or organic, biodegradable waste.

It is extremely illogical for this waste to be dumped into landfills, if it can be treated at home or in the backyard. Not only does it reduce the pressure on landfills, but also proves to be profitable to societies and individuals.

Composting helps to dispose off wet waste in a productive way, creating sustainable gardens, and also provides the opportunity for societies to generate extra income by the sale of compost fertilizer. It enriches the soil quality, helping it retain moisture and reduces the waste volume handed over to the government, which is already struggling pitiably to process India's phenomenal waste generation (1.50 lakh metric tonnes daily).

Most people are repelled by the idea of composting because they are uninformed and present arguments like, 'compost smells', 'composting is messy', 'it takes too long to compost anything'. All of these facts are right if composting is done improperly without the right initiation. Let's get right to it.

**What is organic waste?**

It's biodegradable (green waste) natural waste materials (from plants and animals) that can be broken down into simpler components, carbon dioxide, methane, water, by natural processes such as composting, aerobic/ anaerobic digestion.

**What is composting?**

When the organic waste is decomposed, treated and recycled to create nutrient-rich soil fertilizer and conditioner, it's called composting. It's natural and biological.

**What is considered organic waste?**

* Nitrogen rich waste (green waste)

* Cooked and uncooked food/leftovers (including crushed eggshells)

* Vegetable/fruit skin, seeds, dry snacks, grains, bread crumbs, dairy products

* Juice, old wine, fruit core

* Coffee grounds, used tea powder and tea bags

* Carbon rich waste (brown waste)

Used paper plates/cups, food-soiled paper (excluding Styrofoam), egg cartons

Paper towels and tissues

Grass clippings, leaves, dried flowers, grass, cut flowers, weeds

Cardboard boxes, unpainted non-treated wood and plywood, sawdust, old notebooks (plastic free)

Dry cat/dog food

Main types of 'at home composting'

Vermicomposting means decomposing waste by using earthworms (red wigglers and red worms). It is richer in nutrients and composts faster than regular hot composting, which is done in bigger containers under the sun. Aerobic composting is traditional composting in the presence of microorganisms exposed to air. Composting tools include bins, tumblers and countertop electric composters.

**Easiest DIY way of composting at home**

There should be a Carbon : Nitrogen ratio of 30:1 in your compost, three parts brown waste to one part green waste.

Pick a medium-sized earthen or plastic container and drill 5-6 holes on the sides (more if the container is bigger).

Place newspapers and cardboard under the container to contain any seepage.

Line the bottom of the container with soil or shredded newspaper.

Start adding alternate layers of green waste and brown waste. You can also introduce half composted materials like buttermilk or cow dung to kickstart the process.

Cover the top with plastic, cloth or wooden planks.

Depending on the aeration and the type of waste, your compost will be ready when it turns into a thick, dark brown, earthy-smelling sludge.

The pile shouldn't be too hot or cold and properly aerated. It usually takes two months for the above listed process to produce completely ready compost. You should turn the compost pile every 4-7 days. Use a trowel to dig into the lower layers where you should add fresh piles of green/brown waste. When the pile shrinks to

half the size and the waste is unrecognisable, your compost is ready.

**The Don’ts of composting at home**

Do not use meat, bones, fatty foods, grease, seed producing weeds and dairy. They take longer to break and attract flies.

Don’t add pet feces and diseased garden plants.

Do not use compost bins as a place to dump green waste haphazardly. This is a curated process.

Do not add big chunks. Cut down all waste into smaller pieces.

Do not throw away wet waste not fitting in the pile. Maintain multiple compost bins at the same time.

**Community composting**

Societies of today understand that waste is an asset, not an inconvenience. The scope of community composting starts from backyard composting in housing societies but can extend to entire neighborhoods and town/city communities, entailing, closed-loop (for society only) as well as commercial and scalable initiatives. From maintaining worm farms to static pile composting, from Bokashi method to turned windrow style, or just simple in-vessel composting, the options are diverse. Green living, cleanliness drives, resource stewardship, and eco friendly waste management education and installations have been the tell-tale characteristics of active and mindful communities.

A society can start with a manually operated outdoor composters placed inside its garden or invest in an Organic Waste Converter (OWC). Let’s explore both ideas.

While we understand that open pile composting may not be the ideal way to compost due to space constraints in residential societies, in-vessel composting can be less of a hassle.

Compost tumblers are barrels on stands (or round bins with no assembly) and require 5-6 spins every couple of days or a daily roll each day, depending on the model. You’ll have models with the option of dual chambers for different stages of decomposition and an outlet for compost tea (liquid fertilizer from active compost pile). The C:N ratio of what goes inside still applies (as per the user manual). Prices range from Rs 5000-Rs 13,000 per unit. You’ll need to buy a few based on the number of waste on the daily. The turnaround time for compost tumblers is four to six weeks if the mix is right. But it’s a highly affordable option for housing societies. Even ten tumblers can get you decent results for 200 apartment units.

**Organic waste converter (OWC) :**

For societies that don’t prefer manual composting and have no space for compost piles and multiple tumblers, there’s the alternative to use fully automatic organic waste converters. They produce compost in 24 hours and can deal with large quantities of wet waste generated daily. Models can range from processing power of 5 to 10 batches daily with a capacity of 25-100 kg waste. Manual converters take at least 15 days to produce the same results. A good quality electric OWC can cost between Rs 3.5 lakh to Rs 4.5 lakh and above. Semi automatic machines could cost between Rs 1.5 to Rs 2 lakh.

Tax benefits on compost wet waste produced by Housing society

Housing societies that produce over 100 kg of waste and have an area of 20,000 sq meters are required not only to segregate dry and wet waste but also do on-site disposal. In cities like Pune, the government is offering a 10% for the year 25/26 property tax rebate to housing societies that compost wet waste and up to 7% rebate if a society gives zero garbage to PMC. Such heavy incentivisation could become the norm across the country, if citizens actively participate in waste management self-starter initiatives. Other than that, there’s always a little profit to be made by selling organic compost in farmers markets or even online. Eventually, the OWC would pay for itself.

***

– **अभिजित कुलकर्णी** (बी. ई.)
भ्रमणभाष : ८८८८८७२४५४

# एक पेड माँ के नाम

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**
**मध्यवर्ती इमारत, १ बी. जे. रोड, पुणे-४११००१**
**ई-मेल :** ncs.coopmaharashtra@gmail.com
दुरध्वनी क्रमांक- ०२०-२६१२२८४६/४७ विस्तारीत क्र. २१७ ते २१९

International Year of Cooperatives
Cooperatives Build a Better World

जा.क्र.कें.यो.स.कक्ष/IYC-2025 ''एक पेड माँ के नाम''/१५४/२०२५ दिनांक : १६/०६/२०२५

प्रति,
अध्यक्ष,
राज्य सहकारी गृहनिर्माण अपार्टमेंट्स, महासंघ

**विषय :- IYC-२०२५ अंतर्गत ''एक पेड माँ के नाम'' उपक्रम राबविण्याबाबत.**

**संदर्भ :-** सहकार मंत्रालय, भारत सरकार यांच्या VC दि. २८/०३/२०२५, १६/०५/२०२५, २३/०५/२०२५ आणि १२/०६/२०२५.

उपरोक्त विषय व संदर्भाचे अवलोकन करण्याची विनंती आहे.

संदर्भिय VC द्वारे सुचित केल्यानुसार दि. ०५/०६/२०२५ रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आणि पुढे दि. १५/०७/२०२५ पर्यंत ''एक पेड माँ के नाम'' हा उपक्रम राज्यात राबवायचा आहे.

सहकार विभागातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्था सभासदांनी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम करताना IYC-२०२५ चे बॅनर लावून वृक्ष लागवड करून 'Ek Ped Maa Ke Naam' (एक पेड माँ के नाम) या app वर फोटो अपलोड करणे अभिप्रेत आहे. तसे न केल्यास वृक्ष लागवडीची नोंद योग्यप्रकारे होणार नाही. केवळ नेहमीप्रमाणे फोटो काढणे या मोहिमेमध्ये अपेक्षित नाही. राज्यात किती झाडे लावली याची ॲप च्या Dashboard वरून नोंद होणार असल्यामुळे कृपया सर्व फोटो 'Ek Ped Maa Ke Naam' या app द्वारेच घेण्यात यावे. त्याबाबत पुढीलप्रमाणे कृती करण्याबाबत गृहनिर्माण संस्था सभासदांना सुचित करावे.

१) Google Playstore वरून 'Ek Ped Maa Ke Naam' हे app download करावे.
२) 'Plant a tree' ला click करावे.
३) त्यानंतर 'click image वर click केल्यावर आपला फोटो घेता येईल.
४) फोटो घेतल्यानंतर 'select tree type' असे दिसेल. त्यामध्ये विविध झाडांची नावे dropdown मध्ये दिली आहेत. त्यामधून आपण लावणारे झाड select करावे. तसेच या dropdown मध्ये नमूद नसलेले झाड लावणार असाल तर 'other' select करून झाडाचे नाव नमूद करावे.
५) त्यानंतर State मध्ये जाऊन 'Maharashtra' select करून 'Submit' करावे.
६) आपण काढलेला फोटो अक्षांश, रेखांश सह दिसेल.
७) सदर फोटो पोर्टलवर परस्पर अपलोड झालेला असेल.

तसेच वृक्ष लागवड केलेल्या संस्थांची आणि वृक्षांची संख्या या कार्यालयास दर शुक्रवारी दि. २०/०६/२०२५ पासून दि. १७/०७/२०२५ पर्यंत ncs.coopmaharashtra@gmail.com या ईमेल वर सादर करण्याची विनंती आहे.

**X X X**
**- (राजेश सुरवसे)**
अपर निबंधक (प्रशासन)
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे

***

# ELDER LINE

**NATIONAL HELPLINE FOR SENIOR CITIZENS**

**Call Toll-Free**

# 14567

## ज्येष्ठ नागरिकांसाठी राष्ट्रीय हेल्पलाईन - एल्डरलाईन १४५६७

### एल्डरलाईन मार्फत पुरविल्या जाणाऱ्या मोफत सेवा

- **माहिती** → आरोग्य विषयी जागरुकता, उपचार, वैद्यकीय सुविधा, आहारविषयक, निवारा केंद्रे, वृद्धाश्रम, डे केअर सेंटर, विरंगुळा केंद्र, मेडिटेशन, ज्येष्ठांसंबंधी साधने इ. माहिती
- **मार्गदर्शन** → कायदेविषयक (वैयक्तिक आणि कौटुंबिक), विवाद निराकरण (मालमत्ता, शेजारी इ.) आर्थिक, पेन्शन संबंधित, इच्छापत्र बनवणे, शासकीय योजना इ.
- **भावनिक आधार** → चिंता निराकरण, नातेसंबंध व्यवस्थापन, जोडीदाराचा वियोग, जीवन व्यवस्थापन (वेळ, ताण, राग, एकटेपणा दूर करून सकारात्मकता निर्माण करणे) इ.
- **क्षेत्रीय पातळीवर मदत** → बेघर, अत्याचारग्रस्त, सोडून दिलेल्या ज्येष्ठांना मदत, दुर्लक्षित ज्येष्ठांची काळजी व आधार, गरजू निराधार ज्येष्ठांना निवाऱ्याची सोय व इतर मदत.

# WE'RE HERE FOR YOU

- **ASK US QUESTIONS** → Old Age Homes, Caregiver Services, Activity Centres & more.
- **WE'LL STEP UP FOR YOU** → Intervention for abused and abandoned elderly.
- **WE PROVIDE GUIDANCE** → On legal and pension related issues.
- **WE ALWAYS LISTEN** → Speak to us for any emotional support.

## Projects of Janaseva Foundation, Pune

- Old Age Homes
- Destitute Rehabilitation Centre
- Elder Line - 14567
- Regional Resource & Training Centre (RRTC)
- Skill Development Centre
- Anubhav - I Radio for Senior Citizens
- Rural Hospital
- Naturopathy Centre
- Tree Plantation
- Eye Hospital
- Mobile Health Units & Health Camps
- National Health Mission (NHM)
- Century Club
- Day Care Centre
- Long Term Care Centre
- Celebrating International Day of \ Older Persons - Anand Melava
- R. O. Water Plants
- World Elder Abuse Awareness Day
- Integrated Care for Older People (ICOPE)
- Late Mrs. Kanchanben Birabhai Shah (Chokhawala) Sanskrutik Bhavan
- Physiotherapy Centers
- Constructions of Toilets
- Village Development
- Meet the Stalwart Program
- Nursing School

# नियमित पान

ज्ञानोबा–तुकाराम म्हणत टाळांच्या नादात विठ्ठलाचा जयघोष करीत ज्ञानदेवाची–तुकोबारायांची पालखी पंढरपूरच्या विठोबाच्या दर्शनाला निघाली होती. मी श्रद्धेने ज्ञानदेवाच्या पालखीला वंदन केले. शेकडो वारकरी मंडळी विठ्ठल भेटीला चालली होती... धोतर नेसलेले, पायघोळ पायजमा, सदरा चढवलेले, टोपीवाले वारकरी, त्यासोबत नऊवारीत असलेल्या बायका अशा थाटात विठू नामाचा गजर करीत वारकरी मंडळी पालखीच्या पाठीमागून चालत होती.

वर्षानुवर्षे ही दिंडी, वारकरी मंडळी आषाढी एकादशीला पंढरपूरला जातात. पिढ्यान् पिढ्या ही प्रथा अव्याहत चालू आहे. शेतातील, घरातील, दुकानातील, आपली नित्यकर्मे, अर्थाजनाची आपली कामे, संसारातील सारी सुखदुःखे तशीच मागे ठेवून ही मंडळी दरवर्षी न चुकता या वारीतून पंढरपूरला जातात. सारा रस्ता पायी तुडवीत जातात. मार्गात अडचणी येत असतील, कुठे रस्ता खराब, कुठे सावली नाही, कुठे पाणी नाही, पाय दुखत असतील, वाऱ्या पावसाच्या माऱ्याने तब्येती बिघडत असतील, सारे कष्ट, सर्व प्रकारचे त्रास सहन करीत ही मंडळी पंढरपूरकडे जातात. जो मार्ग ही मंडळी चोखाळतात त्यावर त्यांची केवढी निष्ठा! विठोबाच्या दर्शनाची ओढ अन् त्याचे भेटीसाठी ठरलेली पद्धत. वर्षानुवर्षे पिढ्यान पिढ्या त्याच निष्ठेने विठ्ठल दर्शनाला जायचे. अविचल निष्ठा, स्वीकारलेल्या मार्गावर निष्ठा! त्या मार्गाने जाऊनच विठ्ठल भेटणार अशी निष्ठा.

मला वाटते आपण प्रत्येकजण अशा निष्ठेने आपले काम करू लागलो तर? आपण कोणत्या श्रद्धा बाळगतो? आपण कोणत्या निष्ठा पाळतो?

४०–४५ वर्षांपूर्वीची गोष्ट. मी संभाजीनगरला (तेव्हाचे औरंगाबाद) होतो. दुपारी मुंबईहून फोन आला. सायंकाळी मुंबईस निघायचे. घाई गर्दीत घरी गेलो. बॅग भरली. त्यावेळेस मी जेथे राहात होतो तेथे रिक्षा लवकर मिळत नसत. बस शिवाय पर्याय नाही. ''स्टॉपवर बस थांबली पाहिजे'' मी म्हटलं. तेव्हा चौथ्या इयत्तेत शिकणाऱ्या माझ्या मुलाने सांगितले ''बाबा तू काळजी करू नकोस. आज बसला माझा ड्रायव्हर आहे. त्याला मी सांगतो.''

बसस्टॉपवर मुलगा माझ्यासोबत आला. बस भरलेली होती, तरी त्यानी हात दाखवल्यावर थांबली. मला आश्चर्य वाटले. नंतर केव्हातरी मुलाबरोबर जाऊन ''त्याच्या ड्रायव्हरची'' ओळख करून घेतली. मुलांशी त्याची दोस्ती होती. बसमध्ये मुलांची तुफान गर्दी. प्रत्येक स्टॉपवर मुले चढत. शाळेच्या स्टॉपवर शांतपणे उतरत. बसमध्ये मुलांचा नेहमीचा गोंधळ चाललेला.

''मी मुद्दाम ही शिफ्ट घेतो. मुलांना शाळेत सुखरूप सोडले पाहिजे ना!'' त्याने सांगितले.

मुलांना शाळेत सुखरूप पोहोचवण्याची–आणण्याची जबाबदारी पालकांची, शाळेची, समाजाची, पण त्या जबाबदारीची एकपताका एसटी महामंडळाच्या त्या ड्रायव्हरने स्वतःच्या खांद्यावर घेतली होती. कशासाठी? मुलांना सुखरूप नेले पाहिजे म्हणून ती शिफ्ट मागणारा, गाडी सावकाश नेणारा, त्यांच्या सुरक्षिततेची काळजी करणारा तो एकटाच होता. म्हणूनच तो ''माझा ड्रायव्हर'' होता. त्याच्या गळ्यात माळ नव्हती, कपाळाला गंध नव्हतं, त्याच्या केबिनमध्ये कोणताही फोटो नव्हता. एसटी महामंडळाची बस तो रस्त्यावरून चालवत नव्हता. तो चालवत होता गाडी भक्ती मार्गावरून. मला वाटले आपल्या कार्यावर त्याची जशी भक्ती होती, निष्ठा होती तशीच आपण आपल्या कामावर ठेवली तर?

विठ्ठलाच्या दर्शनाच्या आवडीने नेमाने वारीतून जाणाऱ्यांसारखी आपण प्रत्येकाने आपल्या कामावर निष्ठा ठेवली तर? कदाचित आपला प्रत्येकाचा विठ्ठल निराळा असेल. तो विठ्ठल कोणता व त्यावर निष्ठा कोणती हे आपण प्रत्येकजण शोधू शकलो तर?

असे झाल्यास आपल्या प्रत्येकाला प्रचंड यश मिळेल. पण त्यासाठी आपल्याला तो आपला विठ्ठल शोधावा लागेल. पण त्यावर अचल अशी निष्ठा ठेवावी लागेल.

इंग्रजीत एक म्हण आहे साखळीचे सामर्थ्य तिच्या कमजोर कडीत असते. साखळीच्या २५ कड्यांपैकी फक्त एकच कडी झिजलेली असेल तर संपूर्ण साखळीचे सामर्थ्य कमी होते.

आपणही प्रत्येक जण विविध संस्थेत, कार्यालयात काम करतो. त्या प्रत्येक ठिकाणी अशा साखळ्या असतात. त्या साखळीतला एखादा घटक जर योग्य काम करीत नसेल तर, कार्यक्षमताने काम करीत नसतील तर, त्याचा परिणाम संस्थेच्या एकंदरीत कार्यावर होतो. संस्थेच्या कार्याची परिणामकारकता कमी होते. आपण अशा संस्थेचे तसेच समाजाचे घटक असतो. काही घटक संपूर्ण समाजाची घडी विस्कटून टाकू शकतात.

आपण प्रत्येकजण तक्रार करीत राहातो. भ्रष्टाचाराची, अव्यवस्थेची अनागोंदी कारभाराची, अकार्यक्षमतेची. आपण काय करू शकतो? आपण सारा समाज बदलू शकत नाही, पण आपण स्वतःला बदलू शकतो. ज्या साखळीत आपण काम करतो तेथे आपल्या ठिकाणचा दुवा कच्चा राहाणार नाही, तुटणार नाही अशी आपण काळजी घेऊ शकतो. आपल्याला काम दिले जाते तेव्हा आपल्या खांद्यावर जबाबदारीची एक पताका दिली जाते. आपण ती वाहून देण्याचा प्रयत्न करतो की मिरवित नेतो?

आपण जर असे निष्ठा ठेवून कार्य करत राहिलो, तर अखेर विठूनामाचा गजर करीत दरवर्षी नित्यनेमाने दिंडीतून पंढरपूरला जाणारे वारकरी, तो ड्रायव्हर आणि आपण याच्यात साम्यच दिसेल ना! कारण आपण सर्व आपापल्या विठ्ठलाच्या दर्शनाला निघालेले असू.

*जय जय रामकृष्ण हरी*

– **सुभाष कर्णिक,** उपाध्यक्ष

***

## जून २०२५ मध्ये एकूण ३० संस्थांनी महासंघाचे सभासदत्व घेतले. महासंघ त्यांचे स्वागत करीत आहे.

१) **मधुकोष सह. गृह. संस्था, मर्या.**, बालेवाडी, पुणे ४११०४५.
२) **स्काय आय फर्स्ट भुकूम बिल्डींग नं. १ सह. गृह. संस्था, मर्या.**, मुळशी, पुणे ४१२१११५.
३) **कुशल सागर गॅलेक्सी सह. गृह. संस्था, मर्या.**, शेवाळवाडी, पुणे ४११३०७.
४) **निलया सह. गृह. संस्था, मर्या.**, कात्रज, पुणे ४११०४६.
५) **सिक्स्थ सेन्स सह. गृह. संस्था, मर्या.**, कात्रज, पुणे ४११०४६.
६) **श्री गणेश ड्रीम्स सह. गृह. संस्था, मर्या.**, किवळे, पुणे ४१२१०१.
७) **श्री कुदळे पाटील हेरीटेज सह. गृह. संस्था, मर्या.**, माणिकबाग, पुणे ४११०५१.
८) **स्पंदन रेसिडेन्सी सह. गृह. संस्था, मर्या.**, वारजे, पुणे ४११०५८.
९) **कृष्णा सह. गृह. संस्था मर्या.**, पिंपरी, पुणे ४११०१८.
१०) **भोपाली सह. गृह. संस्था मर्या.**, कोथरुड, पुणे ४११०३८.
११) **संतोष सह. गृह. संस्था, मर्या.**, धनकवडी, पुणे ४११०४३.
१२) **सत्यम राजयोग सह. गृह. संस्था, मर्या.**, धानोरी, पुणे ४११०१५.
१३) **कौसल्या सह. गृह. संस्था, मर्या.**, लोणावळा, पुणे ४१०४०१.
१४) **नियोजन सह. गृह. संस्था, मर्या.**, नवीपेठ, पुणे ४११०३०.
१५) **श्री स्वामी समर्थनगर सह. गृह. संस्था, मर्या.**, वडगाव मावळ, पुणे ४१२१०६.
१६) **भक्ती सह. गृह. संस्था, मर्या.**, घोरपडे पेठ, पुणे ४११०४२.
१७) **नंदनवन सह. गृह. संस्था, मर्या.**, पुणे.
१८) **श्रीवुडस् सह. गृह. संस्था, मर्या.**, धानोरी, पुणे ४११०१५.
१९) **लक्ष्मीनारायण सह. गृह. संस्था, मर्या.**, धनकवडी, पुणे ४११०४३.
२०) **कांचनगंगा एफ विंग सह. गृह. संस्था, मर्या.**, पिंपरी वाघिरे, पुणे ४११०१७.
२१) **अरवली डी विंग सह. गृह. संस्था, मर्या.**, पिंपरी वाघिरे, पुणे ४११०१७.
२२) **विंध्य ई विंग सह. गृह. संस्था, मर्या.**, पिंपरी वाघिरे, पुणे ४११०१७.
२३) **सह्याद्री सी विंग सह. गृह. संस्था, मर्या.**, पिंपरी वाघिरे, पुणे ४११०१७.
२४) **सातपुडा बी विंग सह. गृह. संस्था, मर्या.**, पिंपरी वाघिरे, पुणे ४११०१७.
२५) **कळसूबाई ए विंग सह. गृह. संस्था, मर्या.**, पिंपरी वाघिरे, पुणे ४११०१७.
२६) **गोवर्धन के विंग सह. गृह. संस्था, मर्या.**, पिंपरी वाघिरे, पुणे ४११०१७.
२७) **कावेरी सह. गृह. संस्था, मर्या.**, कोंढवा बु., पुणे ४११०४८.
२८) **विश्वकल्याण नगरी सह. गृह. संस्था, मर्या.**, खेड, पुणे ४१०५०५.
२९) **युगल कौशल्य सह. गृह. संस्था, मर्या.**, हडपसर, पुणे ४११०२८.
३०) **वर्धमान टाऊनशिप डी विंग सह. गृह. संस्था, मर्या.**, हडपसर, पुणे ४११०२८.

***


*With Best Compliments From*

# Structural Auditor

## Indrakumar Jagtap

B.E. (Civil), CHARTERED ENGINEER

**Mobile : 9822332510 * Email : indrakumar.jagtap@gmail.com**

**Web : www.structuralauditorpune.com**

**1, Vyankateshwara Society, Inside From Trimurti Hospital,**
**Sinhgad Road, Vadgaon Budruk, Pune 411041.**

Regd. Newspaper - RNI No. MAHMAR/2015/63869



उपनिबंधक पुणे शहर ४ – श्री. दिगंबर हौसारे यांच्या हस्ते कुमार सबलाईम सह. गृह. संस्थेत वृक्ष लागवड करण्यात आली. – दि. १३ जून २०२५



MCDC आणि महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय प्रशिक्षणात मार्गदर्शन करताना महासंघाचे कार्यकारी संचालक कर्नल प्रमोद दहितुले – दि. १५ जून २०२५




उपनिबंधक पुणे शहर २ – श्रीमती निलम पिंगळे यांच्या हस्ते पंचवटी पाषाण येथे वृक्ष लागवड – दि. ६ जून २०२५



SIILC सकाळ आणि महाराष्ट्र राज्य सह. गृह संस्था आणि अपार्टमेंटस् महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्यवस्थापक अभ्यासक्रम – दि. ६ ते ८ जून २०२५

**संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे भ्रमणभाष क्रमांक तसेच ई-मेल आय.डी. कृपया महासंघाला कळवावेत.**

''वास्तु-दर्शन'' च्या अंकांमध्ये प्रकाशित झालेल्या लेखांतील मतांशी आणि जाहिरातींशी पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण महासंघ सहमत असेलच असे नाही.

**मा. अध्यक्ष / सचिव**

**'वास्तुदर्शन'** हे मासिक पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण महासंघ मर्यादित यांचे मालकीचे असून त्यांचेकरिता मुद्रक व प्रकाशक **श्री. सुहास केशव पटवर्धन** यांनी श्री सिद्धिविनायक एंटरप्राइजेस, ए-६ विजयश्री टॉवर्स, दत्तवाडी, पुणे ४११ ०३०. येथे छापून ३१३ नारायण पेठ, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले.

**संपादक – सुहास केशव पटवर्धन, मुद्रण स्थान : श्री सिद्धीविनायक एंटरप्राइजेस – ९८९००७३९४७**